दि. ३१/०७/२०२३

**प्रसिध्दी पत्रक**

आरोपी लोकसेवक :- श्री. सुरेश देवराव शिंदे, वय ३८ वर्ष, पद- पो.हे.कॉ., नेमणुक- पोलीस ठाणे देवगाव ( रंगारी ) ता.कन्नड जिल्हा औरंगाबाद (ग्रामीण) यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये ५०००/- स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे देवगाव (रंगारी), ता.कन्नड जिल्हा औरंगाबाद (ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री. सुरेश देवराव शिंदे, वय ३८ वर्ष, पद- पो.हे.कॉ., नेमणुक- पोलीस ठाणे देवगाव ( रंगारी ) ता.कन्नड जिल्हा औरंगाबाद (ग्रामीण). |
| लाच मागणी रक्कम | :- | २५०००/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | ५०००/- |
| तपास अधिकारी<br>सहाय्यक अधिकारी | :-<br>:- | श्री. सचिन साळुंखे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद.<br>श्री. हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | दाखल गुन्हयात मदत करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे त्यांच्या मोटया भावाशी व भावजयीशी घरगुती वाद झाले त्या भांडणामुळे त्यांच्यावर पो.स्टे. देवगाव (रंगारी) औरंगाबाद ग्रामीण येथे कलम ३२३, ३२४, ५०६, ४२७ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयात तक्रारदार यांना मदत करण्यासाठी व गुन्हयात अटक न करण्यासाठी व वाढीव कलम न लावण्यासाठी २५०००/- रुपयांची आ.लो.से. श्री. सुरेश शिंदे यांनी लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि. 31/07/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. सुरेश शिंदे यांनी तडजोडीअंती 5000/- रुपये मागणी करुन पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांचेकडून पो.स्टे. देवगाव रंगारी येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.स्टे. देवगाव ( रंगारी ) औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, सचिन साळुंखे, सहाय्यक अधिकारी-पो.नि. हनुमंत वारे, दिपाली निकम यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पो.अं. केवलसिंग घुसिंगे, दिगांबर पाठक, भिमराज जिवडे, चालक सी.एन.बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार अॅप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.